# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/11/2023 (बुधवार) दुपार


### घरफोडी

**पोलीस स्टेशन सावनेर** :– अंतर्गत 02 किमी अंतरावर मौजा वार्ड नं. 16 पहलेपार सावनेर येथे फिर्यादी नामे– श्रीमती रंजिता रमाकांत आमगावकर वय 35 वर्ष रा. वार्ड नं. 16 पहलेपार सावनेर ही दि. 16.11.2023 रोजी दिवाळी सनानिमीत्त आपले माहेरी चौरई (चांद) जि. छिंदवाडा म.प्र. येथे आपले मुलासह गेली होती व तिचे वयोवृध्द सासरे वय 85 वर्ष हे घरी एकटे असल्याने त्यांची देखरेख करणे करीता फिर्यादीची ननद हि फिर्यादीचे घरी आली होती. फिर्यादीची ननद दि. 21.11.23 रोजी सायं. 16.00 वा. आपले माहेरी कोराडी येथे गेली होती व दि. 22.11.2023 रोजी फिर्यादी ही आपले मुलासह आपले सासरी सावनेर येथे आली असता तिला देवघरात ठेवलेली गोदरेज आलमारीतील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व आलमारीचे लॉकर तुटलेले दिसले फिर्यादीने आपले सासरे यांना याबाबत विचारले असता सासरे यांनी सांगितले की मी किचनचा दरवाजा आतुन न लावता बाहेरुन बंद केला होता. फिर्यादीने लॉकरची पाहणी केली असता 1)35 ग्रॅम वजनाची सोन्याची पोत कि.अं. 35000 रु, 2) कानातील सोन्याचे झुमके 10 ग्रॅम कि. अं. 10000 3)10 ग्रॅम वजनाची सोन्याची पोत कि. अं. 10000, 4) 15 ग्रॅम सोन्याचा हार कि. अं. 15000, 5) 100 ग्रॅम वजनाचा चांदीचा कमरपट्टा कि. अं. 5000 रु, 6)100 ग्रॅम वजनाच्या चांदीच्या पायपट्टी दोन जोड कि. अं. 5000, 7)नगदी 100000 रु असा एकुण 1,80,000 रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४, ३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा राजेश हावरे मो नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर